Office of the Principal
S. S. E. S. Amravati's
Science College, Nagpur.
Inward No. 5022 Dt. 23/07/2022.
Sign.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

'सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक ४ ऑगस्ट, १९२३ व्दारा स्थापित, व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ'

महाविद्यालय विकास विभाग

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपूर-४४० ००१, दुरध्वनी क्रमांक: ०७१२-२५२९९३२,२५२२३९०

फॅक्स नं. ०७१२-२५५५७०१. Email ID : infoarcollege@ymail.com

क्र.म.वि.वि./३४२० | दिनांक–२२/०७ /२०२२.

## सत्र–२०२२–२३ करीता अव्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदव्युत्तर पदवी स्तरावरील प्रथम वर्षातील प्रवेशाकरिता

## जाहिर सुचना

सर्व संबंधित विद्यार्थी व पालकांना या जाहिर सुचनेव्दारे सुचित करण्यात येते की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज. नागपुर विद्यापीठाअंतर्गत संलग्नित असलेल्या महाविद्यालयात व विद्यापीठ शैक्षणिक विभागात उपलब्ध ज्या अभ्यासक्रमाचे प्रवेश शासन स्तरावरुन केंद्रीयकृत पध्दतीने करण्यात येत नाही. अशा सर्व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश विद्यापीठाव्दारे दरवर्षी केंद्रीयकृत पध्दतीने करण्यात येत होते.

परंतु दि.१६.०४.२०२१ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या नियमित सभेत बाब क्रं. ३७(८)(३) नुसार सत्र २०२१–२२ पासुन संलग्नीत महाविद्यालयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश विद्यापीठ स्तरावरुन केंद्रीयकृत पध्दतीने न करता महाविद्यालयीन स्तरावर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार सत्र २०२२–२३ करिता देखिल पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश महाविद्यालयीन स्तरावर करावयाचे आहेत. परंतु महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणा–या विद्यार्थ्यांना प्रवेशाकरीता अर्ज सादर करण्यापुर्वी विद्यापीठाच्या https://rtmnuoa.digitaluniversity.ac/ या वेब पोर्टलवर रुपये २०/–एवढे नोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरुन निकाल जाहीर झाल्यापासुन २० दिवसाचे आत नोंदणी करुन सर्व कागदपत्र अपलोड करावयाची आहेत. त्यानंतर झालेल्या नोंदणीची प्रिंट आउट घेवून ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे त्या महाविद्यालयात प्रवेशासाठी निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपासुन २० दिवसाचे आत अर्ज सादर करावयाचा आहे. विद्यापीठाच्या वेब पोर्टलवर नोंदणी करुन कागदपत्र अपलोड केल्याशिवाय महाविद्यालयामध्ये विद्यार्थी प्रवेश घेण्यास पात्र ठरणार नाही. तसेच संबंधीत अभ्यासक्रमाच्या पात्रता परिक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर (मेरीट सुची जाहीर करणे, प्रवेश देणे, प्रतिक्षा यादीतुन प्रवेश देणे इत्यादी) संपुर्ण प्रवेशाबाबतची प्रक्रिया ही निकाल जाहीर झाल्यानंतर २५ दिवसाचे आत पुर्ण करणे क्रमप्राप्त राहील. करीता सर्व संबधित विद्यार्थी, पालक आणि महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी याची कृपया वेळीच नोंद घ्यावी. तसेच कोणत्याही विद्यार्थ्यांची दोनदा नोंदणी होणार नाही याची सर्व संबंधीतांनी खबरदारी घ्यावी.

तसेच सर्व संबंधितांना सुचित करण्यात येते की, विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेशाकरिता विद्यापीठाद्वारे प्रवेश पूर्व परिक्षा (Entrance Exam) घेण्यात येणार असून सदर प्रवेश पुर्व परिक्षेत प्राप्त गुणांकाच्या आधारे विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागात प्रवेश देण्यात येतील याची कृपया सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. प्रवेश पूर्व परिक्षे बाबतची अधिसुचना लवकरच निर्गमित करण्यात येईल. प्रवेशा संबंधीची माहिती ही विद्यापीठाच्या https://rtmnuoa.digitaluniversity.ac/ या पोर्टलवर तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल . तरी सर्व संबंधितांनी याची देखिल वेळीच नोंद घ्यावी.

Copy to all PG Heads/coordinator for n.a.
23.7.22

मा.कुलगुरुंचे आदेशान्वये

(डॉ. रमण मदने)
उपकुलसचिव (म.वि.वि.)

CS Scanned with CamScanner